(336) 10

**परिपत्रक**

विषय:- एफएल-२/सीएल-३ अनुज्ञप्ती मूळ अनुज्ञप्तीधारक मयत झालेनंतर वारसदाराच्या नावे वर्ग करण्याबाबत.

क्रमांक एफएलआर १२९२/२६५७७/सात. मुंबअी २८ जून १९९३.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की एफएल-२ किंवा सीएल-३ अनुज्ञप्तीतील मूळ अनुज्ञप्तीधारक किंवा भागीदार मयत झाल्यानंतर अनुज्ञप्ती त्यांच्या वारसदारांच्या नावे वर्ग करण्यासाठी जिल्हाधिकारी/अधीक्षक आवेदकास आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासाठी पुरेशी संधी न देता त्यांचे अनुज्ञप्तीवरील व्यवहार बंद करतात व पर्यायाने त्यांची अनुज्ञप्तीसुध्दा कार्यान्वित राहू देत नाहीत. वारसदारास आवश्यक बाबींची पूर्तता करण्यास पुरेशी संधी दिली जावी या दृष्टीकोनातून सर्व जिल्हाधिकारी अधीक्षक यांना खालील सूचना देण्यात येत आहेत.

अ] मयत अनुज्ञप्तीधारकाच्या वारसदारास कार्यान्वित असलेली अनुज्ञप्ती पुढे चालू ठेवावयाची असल्यास व तसा अर्ज प्राप्त झाल्यास मुंबअी विदेशी मद्य नियमावली १९५३ च्या अंतर्गत एफएल-२ अनुज्ञप्ती अट क्र. ८ व महाराष्ट्र देशी दारू नियम १९७३ चे अंतर्गत सीएल-३ अट क्र. १७ प्रमाणे उर्वरित कालावधीसाठी विलंब न लावता परवानगी देण्यात यावी व वारसा हक्क प्रमाणपत्र [ [illegible] ] व इतर तत्सम बाबींची पूर्तता करण्यास पुरेसा वेळ देण्यात यावा.

ब] एखादी अनुज्ञप्ती भागीदारीत कार्यान्वित असेल व मूळ अनुज्ञप्तीधारक मयत झाला असेल तर मूळ अनुज्ञप्तीधारकाच्या वारसाहक्कधारकाच्या संमतीने अनुज्ञप्ती पुढे चालू ठेवण्यास हरकत नाही मात्र मूळ अनुज्ञप्तीधारकाच्या वारसदारास जर अनुज्ञप्तीमध्ये येण्याची इच्छा नसेल तर अशा प्रकरणात जिल्हाधिकारी हे सक्षम अधिकारी असल्याने त्यांना योग्य वाटत असल्यास उर्वरित भागीदाराच्या नावे अनुज्ञप्ती चालू ठेवावी किंवा नाही याचा त्यांनी निर्णय घ्यावा अथवा शासनास प्रस्ताव पाठवावा. अशा प्रकरणात शासनाचे आदेश येईपर्यंत व अनुज्ञप्ती भागीदाराच्या नावे वर्ग होईपर्यंत अनुज्ञप्ती चालू ठेवण्यास हरकत नाही.

वर दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी व वारस हक्कदारास अथवा भागीदारास कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

बलदेव चंद

[ बलदेव चंद ]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबअी.

प्रति
१] सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबअी.
२] सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
३] सर्व वरिष्ठ उप आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
४] सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
५] सर्व सहाय्यक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,

प्रत माहितीसाठी
१] सचिव, गृहविभाग [परिवहन] महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबअी.
२] स्वीय सहाय्यक, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, म. रा. मुंबअी
३] सह आयुक्त, व उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, म. रा. मुंबअी,
४] संचालक [ अंमलबजावणी व दक्षता ] राज्य उत्पादन शुल्क, म. रा. मुंबअी
५] या कार्यालयातील अभिलेख शाखा [४] कार्यासन क्र. ३, ४, ५

चिलला/२९"९३